## निशाणी ३२ खालील आदेश

**१.** वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४, नियम १ व २ नुसार जादा मुद्दा काढणेसाठी दिलेला आहे.

**२.** वादीने असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुद्ध रक्कम वसूलीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी हजर झाले व त्यांनी त्यांची कैफियत दाखल केली व न्यायालयाने वादी, प्रतिवादी यांचेत दावा व कैफियतीमधील कथनांवरुन मुद्दे काढलेले आहेत. परंतु, काढलेल्या मुद्दयांकामी न्यायालयाने प्रतिवादी यांनी दिलेल्या कैफियतीमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत अर्जातील अ ते औ प्रमाणे मुद्दे काढणे आवश्यक असताना ते निघाले नाहीत म्हणून ते काढण्यात यावे यासाठी प्रस्तुतचा अर्ज देणे भाग पडत आहे व ते काढल्यास, त्याअनुषंगाने वादी व प्रतिवादी यांना पुरावा देणे न्यायाच्या दृष्टीने सोयीस्कर होणार आहे व त्यामुळे प्रतिवादीचे काही नुकसान होणार नाही.

**३.** प्रतिवादीने त्यांचे म्हणणे निशाणी क्र. ३५ कडे दाखल करुन अर्जातील मजकूर खोटा, बनावट व काल्पनीक असून, तो त्यांनी अमान्य केला आहे. निशाणी ३० कडे काढलेले मुद्दे बरोबर आहेत. दाव्यात केलेली मागणी वादीने शाबीत करणे आवश्यक आहे. अर्जात नमूद केल्याप्रमाणे मुद्दे काढण्याची आवश्यकता नाही, कारण वादी यांनी त्यांचा दावा शाबीत करणे आवश्यक आहे व तो ते त्यांनी शाबीत केल्यास,

प्रतिवादींच्या कथनांचा विषयच येत नाही. त्यामुळे मुद्दे काढण्याची आवश्यकता नाही व शेवटी त्यांनी अर्ज रद्द करावा अशी विनंती केली.

**४.** अर्ज वाचला, त्यावरील प्रतिवादीचे म्हणणे पाहिले. उभय पक्षकारांच्या विधिज्ञांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी युक्तीवाद केला नाही. अभिलेख पाहिला. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीने त्याचेशी करुन दिलेला करार व त्याचा भंग केल्यामुळे प्रतिवादींकडुन येणे असलेल्या रकमेच्या वसूलीसाठी दाखल केलेला आहे. सबब, ते शाबीत करण्याची जबाबदारी वादीची आहे. प्रतिवादी हे त्यांचे कैफियतीमध्ये एका पेक्षा अनेक बचाव घेवू शकतात व तसे त्यांनी या प्रकरणी घेतलेले आहेत. तथापी, त्याबाबत त्यांनी प्रतिदावा दाखल केलेला नाही. निशाणी ३० कडील मुद्द्यांचे शाबीतिच्यावेळी प्रतिवादींनी केलेल्या कथनांचा उहापोह त्यामध्ये होणारच आहे. सबब, त्याबाबत अतिरिक्त मुद्दे काढण्याची आवश्यकता असल्याचे वाटत नाही. सबब, अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, आदेश.

**आदेश**

१. अर्ज निशाणी ३२ नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by RATNAKAR SUDHAKAR KSHIRSAGAR
Date: 2021.12.01 17:39:00 +0530

माळशिरस. (**र. सु. क्षीरसागर**)

दि. ०१/१२/२०२१. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, माळशिरस.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | **N. N. Konda, Grade-II** |
| (b) | Court | : | **Civil Court Senior Division, Malshiras.** |
| (c) | Judgment signed by P.O. on | : | **01.12.2021.** |
| (d) | Judgment uploaded on | : | **01.12.2021.** |